# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


अधिसूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१५/ १२९४

दिनांक : 31 AUG 2015

विषय :**शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश CET मार्फत घेण्याबाबत....**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यातील अभियांत्रिकी ,औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी MHT-CET ही राज्यशासनाची सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. शासनाने या संबंधीचा शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित केला आहे. राज्यातील अभियांत्रिकी ,औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी MHT-CET २०१६ ही प्रवेश परीक्षा देणे **अनिवार्य** आहे. MHT-CET सामाईक प्रवेश परीक्षा ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी च्या अभ्यासक्रमावर आधारित असेल. या प्रवेश परीक्षे करिता तीन प्रश्न पत्रिका असतील. भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयाची प्रत्येकी ५० गुण असलेली सामायिक प्रश्नपत्रिका असेल तथापि गणित १०० गुण व जीवशास्त्र १०० गुण असलेल्या स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतील. अभियांत्रिकी ,औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी च्या MHT-CET प्रवेश परीक्षे साठी विद्यार्थ्यांना एकच अर्ज भरावा लागेल.

**अभियांत्रिकी** पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यात येईल.

**औषधनिर्माणशास्त्र** पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित/ जीवशास्त्र या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यात येईल .

अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रते साठी खुल्या प्रवर्गातील विदयार्थ्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी किंवा समकक्ष परीक्षेत भौतिकशास्त्र व गणित हे अनिवार्य विषय व रसायनशास्त्र / जीवशास्त्र/ जैवतंत्रज्ञान/टेक्निकल व्होकेशनल यापैकी एक विषयात एकूण किमान ५० टक्के(महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय व शारीरिक विकलांग विद्यार्थ्यांसाठी किमान ४५ टक्के ) गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद /फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी विहित केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करणे आवश्यक असेल.

**सर्व संबंधितांनी या अधिसूचनेची नोंद घ्यावी. तसेच सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की ही सर्व माहिती त्यांच्या महाविद्यालयातील मार्च २०१६ मध्ये इयत्ता बारावीची परीक्षा देणाऱ्या किंवा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यातील अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.**

(डॉ. सुभाष महाजन )

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\२०१५-१६\Engineering\Notification of २०१६-१७ admission through CET.docx